# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

Email:- swm@aurangabadmahapalika.org

हेल्पलाइन क्रमांक.155304 / 8055128080 / 8055505002

जा.क्र.मनपा/घकव्यवि/ 432 /2023

दिनांक:- 07/09/2023

**जाहिर आवाहन**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शहराचे स्वच्छते बाबत मानांकन चांगले येण्यासाठी प्रयत्न करीत आहे नागरिकांचाही या कामात महानगरपालिकेस सहकार्य होत आहे, परंतु असे निदर्शनास आले आहे की काही नागरीक या कामी सहकार्य न करता शहर अस्वच्छ करित आहेत त्यामुळे संबंधीतावर दंडात्मक कार्यवाही व बांधकाम मटेरियल शहरात उघडयावर टाकण्यास दंड आकारणी करुन साहित्य जप्त करण्याची कार्यवाही शहर स्वच्छतेच्या दृष्टीने करण्याची आवशकता आहे. त्यामुळे खालील दर्शविल्या विवरणानुसार मनपा दंड आकारणी व साहित्य जप्त करणे असे नियोजन करित आहे.

(वाढीव दंडाचे जोडपत्र)

| अ.क्र | दंडाचा तपशील | दंडाची रक्कम | सुधारीत दंडाची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | नागरिकांनी रस्ते/मार्गावर घाण करणे/ रस्त्यावर कचरा टाकणे. | ५००/- | १०००/- |
| २. | छोटे हॉटेल/दुकाने/संस्था यांनी रस्त्यावर कचरा टाकणे घाण करणे. | १०००/- | २०००/- |
| ३. | Bulk Garbage Generators यांनी रस्त्यावर कचरा टाकणे/घाण करणे. | १० ,०००/- | २०,०००/- |
| ४. | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. | ५००/- | ५००/- |
| ५. | उघड्यावर लघवी/लघुशंका करणे. | १०००/- | १०००/- |
| ६. | उघड्यावर शौच करणे. | २०००/- | २०००/- |
| ७. | कचरा वर्गीकरण न करणे (नागरीक) | ० | ५००/- |
| ८. | कचरा वर्गीकरण न करणे. (संस्था/हॉटेल/दुकाने/आस्थापना/ कार्यालय) | ० | २०००/- |
| ९. | BWG/RWA कचरा वर्गीकरण न करणे. | ० | १०,०००/- |
| १०. | अ) वैद्यकीय हनिकारक कचरा घंटागाडीमध्ये टाकणे. | ० | १०,०००/- |
| | ब) वैद्यकीय हनिकारक कचरा घंटागाडीमध्ये टाकण्याची पुनरावृत्ती करणे. | ० | Seal करणे |
| ११. | हातगाड्या/Howkers यांच्या द्वारे उघड्यावर कचरा टाकणे. | ० | ५००/- |
| १२ | अ) C&D Waste उघड्यावर ठेवणे. | ० | २०००/- प्रति दिन |
| | ब) C&D Waste उघड्यावर तिस-या दिवसापर्यंत ठेवणे. | ० | दंड आकारुन साहित्य जप्ती |

सर्व नागरिकांना या जाहिर आवाहनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरिल कारणासाठी ठरविण्यात आलेल्या दंडाच्या रक्कमे बाबत हे जाहिर आवाहन प्रसिद्धेच्या तारखेपासुन आपल्या हरकती, सुचना व आक्षेप ७ दिवसात लेखी स्वरुपात घनकचरा व्यवस्थापन विभाग, मनपा मुख्यालय टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर दाखल कराव्यात किंवा सदर हरकती, सुचना व आक्षेप महानगरपालिका swm@aurangabadmahapalika.org या संकेत स्थळावर दाखल करण्यात याव्यात, विहित मुदतीनंतर आलेल्या हरकती, सुचना व आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

(जी. श्रीकांत)

भा.प्र.से

आयुक्त तथा प्रशासक

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका